# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे – ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक:०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक

**विषय:–** “दिनांक २५ नोव्हेंबर, २०२४ ते दिनांक ६ डिसेंबर, २०२४ या कालावधीत शिष्यवृत्ती आवेदन पत्र भरण्यासाठी विशेष सप्ताह राबविणेबाबत...”

**संदर्भ :–** **१. मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे संदर्भ पत्र.क्र. महाडीबीटी–२०२४–२५/शिष्यवृत्ती शाखा/८२५१, दि. ०३/१२/२०२४.**

**२. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे संदर्भ पत्र.क्र. उशिसं/शिष्य–२०२४–२५/डीबीटी/६७७२८२, दि. १८/११/२०२४.**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे संदर्भ पत्र क्र. २ अन्वये महाडीबीटी पोर्टवर उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या एकूण १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे. सदरहू शिष्यवृत्ती योजनांची सविस्तर माहिती https://mahadbt.maharashtra.gov.in तसेच https://dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

संचालनालयाचे दिनांक ०५/०८/२०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये, विद्यार्थ्यांनी संबंधित संकेतस्थळावर अर्ज कसा भरावा याबाबत सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. तसेच या शिष्यवृत्ती योजनांचे ऑनलाईन अर्ज विशेष सप्ताह राबवून विद्यार्थ्यांकडून भरून घेण्याबाबत या कार्यालयामार्फत दि. २८/०९/२०२४ व १८/११/२०२४ रोजी याआगोदर परिपत्रकाद्वारे कळविले आहे. मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) यांच्याकडून वेळोवेळी ऑनलाईन मिटींग, सूचना, परिपत्रक, दूरध्वनीद्वारे कळवून देखील उच्च शिक्षण विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांचे प्रवेशित विद्यार्थ्यांच्या तुलनेमध्ये अतिशय कमी ऑनलाईन अर्ज महाडीबीटी पोर्टलवर प्राप्त झाले आहेत.

सबब, मा. विभागप्रमुख/संचालक, सर्व शैक्षणिक विभाग/संकुल व मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करावेत याकरिता मा. सहसंचालक व मा. संचालनालयाच्या संदर्भ पत्र क्र. १ व २ नुसार दिनांक २५ नोव्हेंबर, २०२४ ते दिनांक ०६ डिसेंबर, २०२४ या कालावधीत शिष्यवृत्ती आवेदन पत्र भरण्यासाठी विशेष सप्ताह राबविण्यात यावा, याबाबत सोबत जोडलेल्या परिपत्रकान्वये कार्यवाही करण्यात यावी.

गणेशखिंड पुणे – ७ }
संदर्भ : शै. प्रवेश/3८६७ }
दिनांक : ०४/१२/२०२४ }

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव,

**सोबत : वरीलप्रमाणे.**

**प्रत:**

१. मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. विभागप्रमुख/मा. संचालक, सर्व शैक्षणिक विभाग/संकुल, प्रस्तुत विद्यापीठ.

D:\Vishnu\MAHADBT Circular 2022-23.docx

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**
Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info
फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. महाडीबीटी-२०२४-२५/शिष्यवृत्ती शाखा/ 1241 दिनांक : ०३.१२.२०२४

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
७. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
८. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय : - दिनांक २५ नोव्हेंबर, २०२४ ते दिनांक ६ डिसेंबर, २०२४ या कालावधीत शिष्यवृत्ती आवेदन पत्र भरण्यासाठी विशेष सप्ताह राबविण्याबाबत.**

संदर्भ : - १. शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०२४-२५/डीबीटी/६०२५४३ दि. २७.०९.२०२४.
२. शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि. १३.११.२०२४ रोजीच्या शिष्यवृत्तीच्या बैठकीमध्ये दिलेल्या सूचना.
३. शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०२४-२५/डीबीटी/६७७२८२ दि. १८.११.२०२४.

उपरोक्त विषयान्वये, सर्व अशासकीय अनुदानित, विना अनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालय, सर्व अकृषि विद्यापीठे, सर्व संस्थांना विशेष मोहिमे अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता महाडीबीटी पोर्टलवरुन उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचे ऑनलाईन अर्ज विशेष सप्ताह राबवून विद्यार्थ्यांकडून भरुन घेण्याबाबत या कार्यालयामार्फत दि. २७.०९.२०२४ आणि दि. १३.११.२०२४ रोजी याअगोदरच परिपत्रकाद्वारे कळविले आहे. या कार्यालयाकडून वेळोवेळी ऑनलाईन मिटींग, सूचना, परिपत्रक, दूरध्वनीद्वारे कळवूनदेखील उच्च शिक्षण विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांचे प्रवेशित विद्यार्थ्यांच्या तुलनेमध्ये अतिशय कमी ऑनलाईन अर्ज महाडीबीटी पोर्टलवर प्राप्त झाले आहेत.

जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करावेत याकरीता उच्च शिक्षण, पुणे विभाग अधिनस्त पुणे शहर, पुणे ग्रामीण, अहमदनगर जिल्हा आणि नाशिक जिल्हा मधील सर्व अशासकीय अनुदानित, विना अनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालय, सर्व अकृषि विद्यापीठे, सर्व संस्थांनी मा. संचालनालयाच्या संदर्भिय पत्र क्र. ३ नुसार दिनांक २५ नोव्हेंबर, २०२४ ते दिनांक ६ डिसेंबर, २०२४ या कालावधीत शिष्यवृत्ती आवेदन पत्र भरण्यासाठी विशेष सप्ताह राबवून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचे ऑनलाईन आवेदन पत्र भरण्याकरिता महाविद्यालय स्तरावर संगणक सुविधा, इंटरनेट सुविधा उपलब्ध करुन देऊन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करण्यास प्रोत्साहित करावे. सर्व महाविद्यालय, संस्था आणि विद्यापीठ यांनी महाडीबीटी पोर्टलवर विशेष मोहिमे अंतर्गत राबविण्यात आलेल्या सप्ताहाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल सर्व महाविद्यालयांनी प्रस्तुत कार्यालयास ईमेलद्वारे **jdpunescholarship@gmail.com** या ईमेल आयडीवर सादर करावयाचा आहे.

**(डॉ. अशोक उबाळे)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत पुणे 01**
web: www.dhepune.gov.in Mail: schol.dhepune@gov.in

फोननं.020/26126939, 29707098 फॅक्स 020/26111153

क्र.उशिसं/शिष्य-2024-25/डीबीटी/ दि. 18/11/24

**महत्वाचे परिपत्रक**

**विषय : दिनांक 25 नोव्हेंबर ते 6 डिसेंबर 2024 या कालावधीत शिष्यवृत्ती आवेदन पत्र भरण्यासाठी विशेष पंधरवाडा राबविणेबाबत.**

संचालनालयामध्ये ऑनलाईन घेण्यात आलेल्या दि. 13/11/2024 रोजीच्या बैठकीमध्ये शिष्यवृत्त्ी अर्ज फार कमी प्रमाणात प्राप्त होत असलेबाबत चर्चा करण्यात आली. तसेच अर्जांची संख्या वाढविणेसाठी विशेष उपाययोजना करणेबाबत ठरविण्यात आले.

राज्य शासनाच्या विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी महाडीबीटी पोर्टलद्वारे करण्यात येत आहे. सन 2024-25 करीता महाडीबीटी पोर्टलवरुन उच्चशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांसाठी पात्र विद्यार्थ्यांकडून दि. 25.07.2024 पासून ऑनलाईनपध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

महाडीबीटी पोर्टलवर उच्चशिक्षण संचालनालया मार्फत राबविण्यात येणा-याखालील 14 शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे.

| अ.क्र. | योजनांची नावे |
|---|---|
| 1 | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना |
| 2 | डॉ. पंजावराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना |
| 3 | एकलव्यआर्थिक सहाय्य |
| 4 | गुणवान विद्यार्थ्यांनाआर्थिक सहाय्य योजना (कनिष्ठ स्तर) |
| 5 | गुणवान विद्यार्थ्यांनाआर्थिक सहाय्य योजना (वरिष्ठ स्तर) |
| 6 | राज्य शासनाची दक्षिणा अधिछात्र वृत्ती |
| 7 | शासकीय संशोधनअधिछात्र वृत्ती |
| 8 | जवाहरलाल नेहरु विद्यापीठ शिष्यवृत्ती |
| 9 | राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती |
| 10 | गणित व भौतिक शास्त्रविषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती |
| 11 | शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती |
| 12 | राज्य शासनाची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती (भाग-2) |
| 13 | माजी सैनिकांच्या पाल्यांनाआर्थिक सहाय्य |
| 14 | स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांनाआर्थिक सहाय्य |

सदरहू शिष्यवृत्ती योजनांची सविस्तर माहिती https://mahadbt.maharashtra.gov.in तसेच https://dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यातआलेली आहे.

संचालनालयाचे दि. 05.08.2024. रोजीच्या परिपत्रकान्वये, विद्यार्थ्यांनी उपरोक्त नमुद संकेतस्थळांवर अर्ज कसा भरावा याबाबत सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. तसेच फी मंजूरी बाबत सविस्तर माहिती महाविद्यालयांना देण्यात आलेली आहे.

आता विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज भरणे करीता दि.25.11.2024 ते दि.06.12.2024 या कालावधीत शिष्यवृत्ती आवेदन पत्र भरण्यासाठी विशेष पंधरवाडा राबविण्यात यावा. याबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**विद्यार्थ्यांनी करावयाची पूर्वतयारी -**

1. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योनजनेचेअर्ज भरताना साधारणत: उत्पन्न प्रमाणपत्र, महाराष्ट्रअधिवास प्रमाणपत्र, जातीचा दाखला इत्यादी कागदपत्रे आवश्यक असतात.

2.शिष्यवृत्तीसाठीआधार क्रमांकाचा वापर करुन अर्ज भरता येतो.विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा होणारआहे.त्यामुळे शिष्यवृत्ती रक्कम जमा होण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांचे बँक खात्याशी आधारक्रमांक संलग्न करणे आवश्यक आहे.

3.शिष्यवृत्तीचे शासन निर्णयअटी-शर्ती देय लाभ यांचे अवलोकन करुन विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावा.

4. विद्यार्थ्यांने ऑनलाईन अर्ज भरतांना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे अचूक भरुन ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्वकागदपत्रांसह आपल्या महाविद्यालयांकडे पुढील कार्यवाहीकरीता सादर करावी.

5. ऑनलाईन अर्ज भरतांना काही अडचणी निर्माण झाल्यासआपल्या महाविद्यालय/ संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घेण्यात यावेत.

**महाविद्यालयांनी करावयाची पूर्वतयारी -**

1. शिष्यवृत्तीचे अर्ज भरताना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करणेसाठी महाविद्यालयांनी संगणक, प्रिंटर,इंटरनेट इत्यादी सेवा नि:शूल्क उपलब्ध करुन द्यावे.

2. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज भरणेसाठी आवश्यक कागदपत्रे (उत्पन्नदाखला, रहिवासीदाखला इ.) त्वरीत प्राप्त होणेसाठी तहसिलदार/उपविभागीय कार्यालयांमार्फत महाविद्यालयात शिबिर आयोजित करण्यात यावेत.

3.महाविद्यालयांनी शिष्यवृत्ती निहाय आवश्यक कागदपत्रे विद्यार्थ्यांनी पोर्टलवर अपलोड केली असल्याची खात्री करावी. तसेच संबंधित विद्यार्थ्याने अर्जामध्ये भरलेली ( अभ्यासक्रमाचे नाव, अभ्यासक्रमाचा प्रकार (अनुदानित/ विनाअनुदानित) अभ्यासक्रम कालावधी, प्रवेशाबाबतची माहिती (Admission Details) टक्केवारी, शिष्यवृत्तीलाभ इ. काळजीपूर्वक पडताळणीकरणेआवश्यकआहे.)

4. महाविद्यालयाच्या लिपिकांनी त्यांचेलॉगीनवर आलेल्या अर्जावर तातडीने कार्यवाही ( Approve / Reject / Sent Back) करावी. महाविद्यालयाच्या लिपिकांनी मंजूर ( Approve) केलेले शिष्यवृत्तीचे अर्ज पडताळणीसाठी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्य लॉगीनवर पाठवावे.

5.महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी महाविद्यालयांच्या लिपिकांप्रमाणे विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जाची पडताळणी करुन सदर अर्जावर तातडीने ( Approved / Reject / send Back) कार्यवाही करावी.

6.महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रे उपलब्ध होताच शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरुन घेऊन पात्र अर्ज तसेच महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेले अर्ज संबधीत विभागाकडे विहीत कालमर्यादेत सादर करावीत.

7. महाविद्यालय स्तरावर दि. 25.11.2024 ते दि.06.12.2024 "**विशेष पंधरवाडा** "म्हणून साजरा करण्यात यावा. सदर सप्ताहा मध्ये विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरताना येणाऱ्या अडचणींचे समाधान महाविद्यालयातील शिष्यवृत्ती नोडल अधिकारी यांनी तात्काळ करावे.

तसेच संबधित विभागीय सहसंचालकांनी शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज, आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत अपलोड असणारे व ज्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती रक्कम बरोबर दर्शविली आहे अशाच विद्यार्थ्यांचे अर्ज संचालनालयाच्या (DHE Login) वर मंजूरीसाठी तात्काळ पाठविण्यात यावेत.

8. दि. 25.11.2024 ते दि. 06.12.2024 या सप्ताहामध्ये विद्यार्थ्यांना, राज्यशासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांची सविस्तर माहिती देण्यात यावी व विद्यार्थ्यांकडून जास्तीत जास्त अर्ज भरुन घेण्यात यावेत. कोणताही विद्यार्थी शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता महाविद्यालयांनी घ्यावी.

तसेच सदर विशेष पंधरवाडयाचा संकलीत अहवाल दर चार दिवसांनी संचालनालयास सादर करण्यात यावा.

तसेच शिष्यवृत्ती योजनांची प्रभावी पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी शिष्यवृत्ती योजनांबाबतची सर्वसाधारण माहिती सर्व अधिनस्त विद्यापीठ / महाविद्यालय यांना त्यांचे संकेतस्थळ / नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात यावेत.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 18-11-2024 18:00:32

**(डॉ शैलेंद्र देवळाणकर)**
शिक्षण संचालक (उच्चशिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे – 1.

प्रत - 1. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.
2. कुल सचिव, सर्व अकृषि विद्यापीठे - आपल्या अधिनस्त सर्व महाविद्यालये/ संस्था यांना तात्काळ कळविण्यात यावे.
3. प्राचार्य, शासकीय, अशासकीय अनुदानित, कायमविना अनुदानित महाविद्यालय/ संस्था.